# ठाणे महानगरपालिका, ठाणे
# राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय
# छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय
# जाहिरात

ठाणे महानगरपालिकेच्या राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाच्या आस्थापनेवर **"परिचारीका"** (Staff Nurse) या संवर्गातील रिक्त असलेली पदे तीन महिन्याच्या कालावधीसाठी एकत्रित मानधनावर भरण्यासाठी पात्र व इच्छुक उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. मुलाखतीची वेळ व दिनांक उमेदवारांना त्यांच्या ईमेल आयडी वर कळविण्यात येईल.

सर्व कागदपत्रे मुलाखतीचे वेळी दोन प्रतीमध्ये सादर करावीत. कागदपत्रे नसणारे उमेदवार मुलाखतीस अपात्र ठरतील. शैक्षणिक अर्हता व पूर्ण अनुभवाची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांचीच फक्त मुलाखत घेतली जाईल.

| अ.क्र | पदनाम | पद संख्या | शैक्षणिक अर्हता व अनुभव | दरमहा मानधन | वय |
|---|---|---|---|---|---|
| १) | **परिचारीका (Staff Nurse)**<br><br>अनु.जाती - २१<br><br>भ.ज.ड - ०१<br><br>इ.मा.व - ३० | ५२ | १) मान्यता प्राप्त नर्सिग कोर्स पूर्ण करुन महाराष्ट्र नर्सिग कौन्सिलकडे नाव नोंदणी बंधनकारक शासकीय अथवा निमशासकीय रुग्णालयातील कामाच्या अनुभवास प्राधान्य | २००००/- प्रतिमहा एकत्रित मानधन | शासन निर्णय क्र.एसआरव्ही २०१५/प्र.क्र.४०४/कार्या.१२ दिनांक २६ एप्रिल २०१६ अनुसार खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्ष मागासवर्गीयांसाठी ४३ वर्षे |

**महत्वाची सूचनाः-**

१) पदभरतीबाबत विस्तृत अर्जाच्या लिंकसाठी येथे https://forms.gle/८८eqV२६ZyWcnnZ९९ क्लिक करावे. सदर अर्जाची लिंक दिनांक १५/०३/२०२१ ते दिनांक २०/०३/२०२१ पर्यंत उपलब्ध राहील.

२) उमेदवाराचे स्वतःचे gmail account असणे आवश्यक आहे.

३) अर्ज योग्य रित्या भरुन झाल्यावर Submit हे बटन क्लिक करावे. तसेच उमेदवाराने एकच अर्ज सादर करावा. एकापेक्षा जास्त अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

४) अर्जाची प्रत आपल्या gmail Id वर प्राप्त होईल (google form) या नावे

५) सदर अर्ज प्रिंट करुन मुलाखतीच्या दिवशी प्रिंट केलेल्या अर्जासह उपस्थित रहावे.

टिप :-

१) उमेदवाराने अर्ज भरताना शैक्षणिक अर्हते मधील गुणांची टक्केवारी, अनुभवाचा कालावधी इत्यादी माहिती बिनचूक भरावी. अर्ज भरण्यास चूक झाल्यास अर्ज नाकारण्यात येईल.

२) अनुभवाची गणना करताना शासकीय/नियमशासकीय, स्थानिक संस्थेकडील कामकाजाचा अनुभव हा ६ महिन्यापेक्षा जास्त अनुभवासाठी प्रथम ६ गुण असे धरण्यात येतील. प्रति तीन महिन्यासाठी १.५ असे गुण धरण्यात येईल. तीन महिन्याच्या आतील अनुभव विचारात घेतला जाणार नाही. जास्तीत जास्त गुण हे २० असतील.

३) अनुभवाच्या अटीची पूर्तता करणारे उमेदवार मुलाखतीस नसल्यास नवोदित उमेदवारांची नेमणूक केली जाईल.

४) उमेदवारांना मिळालेले गुण जर समान असतील तर वयाने जेष्ठ उमेदवारास प्राध्यान्य देण्यात येईल.

५) उमेदवाराने सादर केलेल्या अनुभवाचा दाखला अथवा इतर कोणताही दाखला बोगस आढळुन आल्यास अशा उमेदवारावर फौजदारी गुन्हा दाखल होऊ शकेल व त्याची जबाबदारी संबधित उमेदवारावर राहील.

**अटी व शर्ती**

१) जाहिरातीमध्ये प्रसिध्द केलेल्या पदांमख्ये अंशतः बदल करणे, पदांच्या एकुण व संवर्ग निहाय संरचनेमध्ये वाढ किंवा घट तसेच निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उचित पध्दतीचा अवलंब करुन उमेदवाराची चाळणी करण्याचे सर्व अधिकार महापालिकेने राखुन ठेवलेले आहेत. याबाबत उमेदवाराला कोणतीही तक्रार अथवा दावा सांगता येणार नाही.

२) निवड झालेल्या उमेदवारांची यादी ठाणे महानगरपालिकेच्या www.thanecity.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

३) शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव, अधिवास दाखला (Domicile Certificate) प्रमाणपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती मुलाखतीचे वेळी मुळ दाखल्यासह सादर करणे आवश्यक आहे. चुकीची माहिती असल्यास अर्ज अपूर्ण समजून नाकारला जाईल.

४) उमेदवारांस मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

५) मुलाखतीचे दिनांकाचे दिवशी उमेदवाराचे वय वयोमर्यादेमध्ये असणे आवश्यक आहे.

६) स्थानिक पोलिस स्थानकाचा संपूर्ण पत्ता अर्जावर नमूद करण्यात यावा.

७) उमेदवाराने शैक्षणिक पात्रता, अनुभव व मुलाखतीत मिळालेल्या एकत्रित गुणांच्या आधारे व त्या उमेदवाराची कागदपत्रे वैध ठरल्यास अंतिम निवड यादी तयार केली जाईल.

८) उमेदवाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली अथवा मुलाखतीस उपस्थित राहीला म्हणजे मुलाखतीस बोलावण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

९) उमेदवारांनी महानगरपालिकेकडे अर्ज सादर करातांना न्यायप्रविष्ट प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगाविषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई संबधीची माहिती महानगरपालिकेस देणे आवश्यक आहे. सदर माहिती न दिल्यास उमेदवाराची सेवा कोणत्याही टप्यावर रद्द करण्याचे अधिकार महानगरपालिकेस असतील.

१०) उमेदवारांना मुलाखतीस स्वखर्चाने यावे लागेल.

११) एखाद्या अर्जदाराने त्यांची निवड करणेसाठी निवड समिती अध्यक्ष, सदस्य तसेच अधिकाऱ्यांवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष राजकीय अथवा अन्य प्रकाराने दबाव आणल्यास अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यांस निवड प्रक्रियेतुन अपात्र ठरविण्यात येईल.

१२) निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने दिलेली माहिती/अगर कागदपत्रे खोटी सादर केलल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची निवड/नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल. तसेच शासकीय सेवेत असल्यास बडतर्फ करण्यात येईल.

१३) अ) जन्म दाखला/शाळा सोडल्याचा दाखला.

ब) मुलाखतीच्या वेळेस उमेदवाराने शैक्षणिक पात्रतेची कागदपत्रे, वास्तव्याचा पुरावा व अनुभव या कागदपत्रांचा संच व या संचाची स्वसाक्षांकित केलेली एक झेरॉक्स प्रत सोबत आणावी.

१४) स्थानिक पोलिस स्टेशनमधून चारीत्र्य व वास्तव्य दाखला निवड झाल्यावर सात दिवसांत देणे बंधनकारक आहे.

१५) निवड झालेल्या उमेदवाराने विहित नमुन्यात एक हमीपत्र नेमणूक पत्रानंतर सात दिवसांत देणे बंधनकारक आहे.

१६) सदर पदाची मुदत जास्तीत जास्त तीन महिने असेल.

१७) नियुक्त होण्याच्या तारखेचा उल्लेख नेमणूक पत्रात असेल. त्या तारखेपासून तीन महिने मोजले जातील. नेमणूकीच्या अंतिम तारखेत बदल केला जाणार नाही.

१८) उशिराने हजर होणाऱ्यांसाठी अंतिम तारखेत बदल केला जाणार नाही.

१९) हंगामी (अस्थायी) भरती केलेल्या या पदांवर सरळसेवेने भरती करण्यात आल्यास सदरची हंगामी (अस्थायी) नेमणूक रद्द करण्यात येईल/होईल.

२०) तीन महिन्याच्या कालावधीनंतर/अंतिम तारखेनंतर नेमणूकीस मुदतवाढ द्यावी कि नव्याने जाहिरात देऊन नेमणूक प्रक्रिया राबवावी याचा निर्णय विभागातर्फे घेण्यात येईल.

२१) गुणानुक्रमानुसार एकापेक्षा जास्त उमेदवार एकाच पात्रतेचे ठरल्यास खालील बाबीनुसार प्राध्यान्यक्रम ठरवला जाईल.

अ) ठाणे शहरात मागील एक वर्षाहून जास्त वास्तव्याचा पुरावा

ब) विज्ञानशाखेतील पदवीस व अनुभवास प्राध्यान्य.

क) एकापेक्षा जास्त प्रयत्नात उत्तीर्ण झालेल्यांचे पांच गुण वजा होतील.

२२) नेमणुक पत्र दिनांकापासून सात दिवसांत प्रत्यक्ष हजर होऊ न शकणाऱ्या/न होणाऱ्या उमेदवारांची नेमणूक रद्द केली जाईल.

अधिष्ठाता
राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालय
छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय